# महाराष्ट्रातील भटके-विमुक्त

## सद्य:स्थिती आणि आव्हाने

डॉ. [illegible]



# महाराष्ट्रातील भटके-विमुक्त
## सद्य:स्थिती आणि आव्हाने

संपादक

डॉ. अनिल सपकाळ । डॉ. नारायण भोसले

फुले-आंबेडकर अध्यासन
मुंबई विद्यापीठ

सायन
सायन पब्लिकेशन्स प्रा. लि.

नितीन कोत्तापल्ले
सायन पब्लिकेशन्स प्रा. लि.
तिसरा मजला, स्वोजस हाऊस
१९५९, सदाशिव पेठ, हत्ती गणपतीजवळ
पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४७६९५४
ईमेल : scionpublications@rediffmail.com
www.scionpublications.com

आणि

फुले-आंबेडकर अध्यासन
मुंबई विद्यापीठ,
समन्वयक, डॉ. अनिल सपकाळ
रानडे भवन, विद्यानगरी, मुंबई ४०००९८

■

© सर्व हक्क सुरक्षित

■

प्रथमावृत्ती । २६ जून २०१९
छत्रपती शाहू महाराज जयंती
(सामाजिक न्याय दिवस)

मुखपृष्ठ ।
राजा बडसल

■

अक्षरजुळणी ।
रवींद्र जगताप

■

मुद्रितशोधन ।
गणेश मेरगू

■

मुद्रणस्थळ ।
श्री अंबिका ऑफसेट
सदाशिव पेठ, पुणे

■

मूल्य । रु. ३५०

■

ISBN : 978-93-86651-26-6

परवानगीशिवाय या पुस्तकातील कुठलाही भाग कुठल्याही कारणास्तव अथवा कुठल्याही नमुन्यात पुनर्मुद्रित करता येणार नाही. या प्रकाशनासंदर्भात अनधिकृत कृत्य केलेले आढळल्यास झालेल्या नुकसानीसाठी त्या व्यक्तीवर अथवा संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुंबई विद्यापीठाचे फुले-आंबेडकर अध्यासन सहमत असेलच असे नाही.

१८. भटक्या विमुक्त शैक्षणिक प्रश्न आणि आव्हाने
डॉ. संजय प्रकाश बालाघाटे ........................ २३३

१९. विमुक्त भटक्या जमातींच्या जातपंचायती - दशा व दिशा
कालिदास शिंदे ........................ २४१

**विभाग ४ : संकीर्ण**

२०. सोलापूर सेटलमेंटचा अभ्यास
जॉर्ज रोनाल्ड ........................ २५३

२१. घिसाडी जमात : ऐतिहासिकता, सद्यःस्थिती आणि आव्हाने
प्रा. किरण सर्जेराव पवार ........................ २६५

२२. माढा तालुक्यातील भटक्या विमुक्तांची सामाजिक आर्थिक स्थिती
प्रा. राजेंद्र लोखंडे ........................ २७२

२३. मुसलमान भटके आकलनाच्या नव्या दिशा
सलीम शेख पिंजारी ........................ २८०

२४. नाल मारलेले, नाळ तुटलेले लोक
प्रशांत खुंटे ........................ २९६

लेखक परिचय ........................ ३१८

# माढा तालुक्यातील भटक्या विमुक्तांची सामाजिक व आर्थिक स्थिती

◉

प्रा. राजेंद्र लोखंडे

इ. स. १९ व्या शतकापासून विविध इतिहासकारांनी व संशोधकांनी अखिल मानवजातीसंबंधी विविध दृष्टिकोनातून इतिहासलेखन व इतिहास-संशोधन केलेले आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातील मानवासंबंधी इतिहासामध्ये संशोधनाच्या माध्यमातून भर पडत आहे. विशेषत: यामध्ये आदिवासी जमाती, भटक्या जमाती, भटक्या विमुक्त जमाती इत्यादींचा समावेश होतो. मानवी जीवनामध्ये प्रत्येक जमातीचे, जातीचे, समूहाचे समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन भिन्न भिन्न स्वरूपाचे असते. परंतु आजपर्यंतच्या इतिहासलेखनामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल, वंचिताच्या इतिहासाविषयी वस्तुनिष्ठ संशोधन न होणे ही भारतासारख्या खंडप्राय व विविधतापूर्ण असलेल्या देशाची खंत आहे. भारतात आदिवासी भटक्या जमातींची संख्या सुमारे १६०० ते १८०० असलेली दिसून येते. त्याविषयी २०व्या शतकामध्ये रणजित गुहा, सुमित सरकार या इतिहासकारांनी भारतीय इतिहासलेखनामध्ये नवीन विचारप्रवाह 'वंचिताचा इतिहास' सुरू केलेला असला तरी अजून प्रादेशिक किंवा क्षेत्रीय इतिहास संशोधनपद्धतीमध्ये संशोधकांनी या विचारप्रवाहाचा अवलंब केलेला नाही. त्या अनुषंगाने माढा तालुक्यातील भटक्या-विमुक्त जाती-जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती याविषयी मांडणी करण्यात आली आहे. त्यामध्ये पुढील जातींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**नंदीवाले**

महाराष्ट्रामध्ये नंदीवाले या जमातीचा समावेश भटक्या-विमुक्त जमातीमध्ये

करण्यात आलेला आहे. यांचे मूळ वस्तिस्थान तमिळनाडू असल्याने त्यांची मातृभाषा तेलगूसदृश असून मराठी, हिंदी शब्दाचे मिश्रण आढळते. नंदीवाल्यांचे नटिला नंदीवाले, रळवा नंदीवाले, कोमटी नंदीवाले, भांडी विकणारे नंदीवाले अशा प्रकारे व्यावसायिक विभाजन आढळून येते.[१] यांचा परंपरागत मुख्य व्यवसाय नंदीबैलाचे खेळ करून दाखविणे हा आहे म्हणून या जमातीला नंदीवाले असे म्हणतात. या जमातीमध्ये जातपंचायतीच्या प्रमुखाला पाटील असे म्हणतात. पंचायतीच्या कामामध्ये पाटील या जमातीमधील ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला घेतो व न्यायनिवाडा करतो.[२] माढा तालुक्यात हा समाज परिते, परितेवाडी, वरवडे, मोडनिंब या परिसरामध्ये आढळून येतो. या जमातीमध्ये जाधव, भिंगारे, काळे, चौगुले, चव्हाण, पवार इत्यादी आडनावाचे लोक तालुक्यामध्ये आहेत. काही गावांमध्ये पालाऐवजी स्वतःची घरे बांधून शेती, सावकारकी, जनावरांचा व्यापार इत्यादी व्यवसाय हया समाजातील व्यक्ती करीत आहेत. अलीकडच्या काळामध्ये शिक्षण व माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे या समाजात सामाजिक सुधारणा घडून आल्या आहेत. ह्या जमातीमधील लोक बेंदूर हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात.[३]

### कैकाडी

या जमातीचे लोक कर्नाटक, दक्षिण महाराष्ट्र व मध्य प्रदेशात आढळतात. या जमातीचे वैशिष्ट्य गावाच्या बाहेर झाडाखाली पाले ठोकून राहतात. यांच्याबरोबर शेळ्या, मेंढ्या व कोंबड्या हे प्राणी त्यांच्याबरोबर असतात. कैकाडी जमातीची बोलीभाषा तेलुगुमिश्रित कानडी आहे.[४] त्यांच्यामध्ये प्रामुख्याने कामठी, गावरानी, कुचेकरी, माकडवाले, उरु कैकाडी इत्यादी नऊ पोटजाती आढळून येतात व आपले मूळ वस्तिस्थान तेलंगणा राज्य असल्याचे सांगतात. माढा तालुक्यामध्ये कैकाडी जमातीमधील व्यक्ती गावोगावी उदरनिर्वाहासाठी व व्यावसायानिमित्त भटकंती करताना दिसून येतात. या जमातींना तांबटकर असे म्हणतात. हे लोक एखाद्या गावामध्ये ठरावीक दिवस मुक्काम करतात.[५] आणि तेथील शेतकऱ्यांची शेतीची अवजारे तयार करणे. उदा., विळा, कुदळ, खुरपे, टिकाव इत्यादी कामे केली जातात. त्यामधून त्यांना रोख उत्पन्न उपलब्ध होते. काही लोकांनी अलीकडच्या काळामध्ये कायम वस्ती केलेली आढळून येत आहे.

या जमातीमधील काही लोक कुंचे, केरसुण्या, टोपल्या, पक्ष्यांचे पिंजरे, शिकार करण्याची जाळी, मुलांची खेळणी तयार करुन गावोगावी फिरून

विकण्याचे काम करतात.[६] तर काही जमातीमधील लोक माकडे किंवा साप या प्राण्यापासून मनोरंजनाचा खेळ करून दाखवितात त्यांना सापगारुडे असे म्हणतात. तसेच जादूटोणा, भानामती इत्यादींमध्ये हे लोक निपुण असल्याचे दिसून येते. या समाजातील लोक प्रामुख्याने देवधर्म हा बहिरोबा, भवानीदेवी, मरीआई, तुकाई, यमाई इत्यादीचा एक फोटो घरामध्ये ठेवून पूजन करतात. तर मारुती, खंडोबा यांचीही उपासना करतात व गोसाव्यांना गुरू मानतात. शकुन, जादूटोणा, चेटूक, भानामती यावर त्यांची श्रद्धा असते.

तसेच त्यांची विवाहपद्धती या समाजातील विवाहपद्धती ही प्रामुख्याने धनताळे पोटजातीतील पंचामार्फत ठरविले जाते. विवाहाच्या विधीच्या वेळी घरात पिंपळाची डहाळी व कलशामध्ये पाणी भरून ती वधू-वरासमोर ठेवतात आणि लोकांनी अक्षता टाकल्यानंतर हा विधी पूर्ण झाला असे समजले जाते.[८] अविवाहित पुरुषाला विधवा स्त्रीशी विवाह करण्यासाठी प्रथम शमी नावाच्या वृक्षाबरोबर लग्न करण्याची प्रथा आहे आणि नंतर त्या विधवा स्त्रीबरोबर विवाह लावण्यात येतो अशी आख्यायिका प्रचलित आहे. यावरून या समाजामध्ये विधवा पुनर्विवाह प्रचलित असल्याचे दिसून येते. या समाजाची मृतकाचे दफनविधी हिंदूप्रमाणे केले जाते.[९]

माढा तालुक्यामध्ये या जमातीची लोकसंख्या कमी प्रमाणावर दिसून येत असली तरी स्थलांतरित भटका समाज मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. अलीकडच्या काळात महाराष्ट्र शासनाने विविध राबविलेल्या योजनाचा लाभ या जमातींना होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या समाजातील लोक डॉक्टर, इंजिनिअर, वकील इत्यादी पदावर कार्य करीत असताना दिसून येतात.

**गोंधळी**

या भटक्या जमातीची लोकवस्ती प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश या राज्यात मोठ्या प्रमाणावर आढळून येते आणि गुजरातव्यतिरिक्त इतरत्र विखुरलेले लोक दिसून येतात. या जमातीचे लोक तुळजापूर हे मूळ वस्तिस्थान मानतात.[१०] अंबाबाई आणि भवानीदेवी यांचे सेवेकरी असल्यामुळे बहुजन समाजामध्ये या जमातीच्या लोकांना मोठी प्रतिष्ठा आहे. माढा तालुक्यात या ग्रामीण भागात या लोकांची वस्ती दिसून येते. या लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन भिक्षा मागणे हे आहे. हे लोक गोंधळ-जागरणाचा कार्यक्रम करतात.[११] त्यामुळे समाजामध्ये त्यांना मानसन्मान दिला जातो. मराठी सत्तेच्या कालखंडामध्ये या लोकांनी पोवाडे, लोकगीते गाऊन देशाभिमान जागृत केला.

गोंधळी जमातीमध्ये अनेक पोटजाती दिसून येतात. त्यामध्ये प्रामुख्याने कदमराय, रेणुकराय, मराठे, कुंभार इत्यादी आहेत. या जमातीचे रीतिरिवाज व संस्कार कुणब्याप्रमाणे असतात. विवाहविधी या जमातीमध्ये वेगळ्या पद्धतीने केला जातो. विवाहाच्या वेळी नवरदेवाच्या गळ्यामध्ये या जमातीमधील पाच विवाहित व्यक्ती कवड्याची माळ घालतात व हा गोंधळी होण्याचा विधी समजला जातो.[१२] काही व्यक्ती नवसासाठीही गोंधळी होतात परंतु त्याची जात न सोडता व्यक्तीला ही दीक्षा घेण्याची प्रथा प्रचलित आहे. गोंधळी जमातीमधील लोकसाहित्य व वाङ्मय उपयोजित श्रेष्ठ दर्जाचे आहे. कथा, लोकगीते, पोवाडे हे त्यांचे मुख्य घटक आहेत. उदा. मीठमिरचीचे भांडण, कोल्ह्याचे लगीन इत्यादी विनोदी वाङ्मय व मनोरंजनाचे श्रेष्ठ साधन ठरते.[१३]

माढा तालुक्यामध्ये या जमातीस एक महत्त्वपूर्ण वेगळे स्थान असून त्यांच्या कलेमुळे समाजातील प्रत्येक शेतकरी, राजकारणी उद्योग व व्यावसायिकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध प्रस्थापित झालेले आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्याही या समाजाची प्रगती झालेली दिसून येते. अलीकडच्या काळात काही लोक शेतीव्यवसायही करू लागले आहेत. आधुनिक शिक्षणपद्धती व महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या योजनामुळे या समाजातील लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती बदलत आहे.

**डोंबारी**

ही भटकी जमात कोल्हाटी या नावानेही ओळखली जाते. महाराष्ट्र आणि दक्षिण भारतात यांचे वसतिस्थान असल्याचे आढळून येते. हा समाज भटका असून नेहमी स्थलांतर करीत असतो. या समाजातील लोक गावोगावी फिरुन लोकांच्या मनोरंजन करण्याचे कार्य करीत असतात, त्यामध्ये प्रामुख्याने दोरीवर चालणे, काठीवर नाचणे इ. कसरतीचे खेळ करून दाखविणे इत्यादी यांचा प्रमुख व्यवसाय करताना दिसून येतात.[१४] शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसेनीय संहितेत वेळेवर नाचणाऱ्या व्यक्तीचा उल्लेख झालेला आहे. त्यावरून अशा प्रकारचे कसरतीचे खेळ करून दाखविणाऱ्या जमातीची प्राचीनता दिसून येते. 'संगीत रत्नाकर' नावाच्या ग्रंथामध्येही कोल्हाट्याचा उल्लेख सापडतो.

या जमातीमध्ये प्रामुख्याने रेड्डी व आरय असे दोन पंथभेद दिसून येतात तसेच जमातप्रमुखास मुट्ठली गुरू असे म्हणतात.[१५] त्याच्याकडे या जमातीचे धार्मिक व सामाजिक सर्वाधिकार असतात. कर्नाटकातील कडप्पा जिल्ह्यातील चितवेल या ठिकाणी त्याचे प्रमुख देवस्थान असून वर्षातून एकदा सर्वजण यात्रेनिमित्त एकत्र येतात.

याशिवाय कलाकुसरीच्या वस्तू तयार करणे. फण्या, कंगवे विकणे इत्यादी उदरनिर्वाहासाठी व्यवसाय करतात. तसेच विषबाधा, वनौषधी गोळा करणे हेही काम करीत असताना दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये या समाजातील लोक सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर स्थायिक झालेले आढळून येतात. करमाळा तालुक्यातील नेरले या गावामध्ये त्यांची लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर आढळते.[१६] त्या तुलनेमध्ये माढा तालुक्यामध्ये या जमातीची लोकवस्ती तुरळक आहे. अलीकडच्या काळात हे लोक शेतीव्यवसाय व नोकरी करू लागल्यामुळे त्यांचे सामाजिक व आर्थिक स्थित्यंतर होत आहे.

**पारधी**

एक भटकी जमात म्हणून आळखली जाते. पारधी हा शब्द पारध आणि शिकार या धातूपासून तयार झाला आहे. या लोकांचे मूळ वस्तिस्थान राज्यस्थानमधील राजपूतना होय. ते राजपूत राजे राजवड्याकडे सुरक्षारक्षक म्हणून काम करीत असत. ब्रिटिश राजवटीमध्ये स्थलांतरित झाल्याचे उल्लेख सापडतात.[१७] महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने जळगाव, धुळे, नाशिक, सोलापूर, अहमदनगर, विजापूर या जिल्ह्यांमध्ये यांची लोकवस्ती आढळून येते. प्रदेशानुसार या जमातीला वेगवेगळी नावे आहेत. दक्षिण महाराष्ट्रात फासेपारधी तर विजापूरला आरवी संचार या नावाने ही जमात ओळखली जाते.[१८]

या जमातीमध्ये अनेक पोटजाती आढळून येतात. हरदापारधी, मीर, वाघारी, मेवारी, टकारी, पालपारधी कोस्वर, भिल्लपारधी, लगोरी पारधी, गायपारधी इत्यादी त्यांच्या पोटजाती आहेत. या समाजातील चालीरीतींमध्ये भिन्नता दिसून येते. समाजातील भांडणतंटा सोडविण्यासाठी जातपंचायत असते. विशेषतः गुन्हेगारांना कडक शिक्षा देण्याची अघोरी प्रथा या जमातीमध्ये प्रचलित असल्याचे दिसून येते. विवाहप्रथा या समाजामध्ये हिंदूप्रमाणे दिसून येते. समान देवक असणाऱ्या जातीमध्ये विवाह निषिद्ध मानला जातो. फासेपारधी जमातीमधील विवाहप्रथेचे वेगळेपण दिसून येते. मुलाच्या वडिलांकडून मुलीच्या वडिलास काही रोख रक्कम हुंड्याच्या स्वरूपामध्ये दिली जाते, त्यास देज असे म्हणतात. तसेच या जमातीमध्ये विवाहित स्त्रिया मांसाहार करीत नाहीत; ते निषिद्ध मानले जाते. विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्यास या जमातीत परवानगी दिली जाते, त्यामुळे स्त्रियांना स्वावलंबी जीवन जगण्याचे अधिकार असल्याचे दिसून येते.[१९]

या जमातीमधील लोक मरीआई, अंबाबाई, मांढरदेवी, खंडोबा, लक्ष्मी, दुर्गा, सप्तशृंगी इत्यादी देवदेवताची पूजाअर्चा करतात. या समाजामध्ये प्रामुख्याने

जादूटोणा, चेटकीण इत्यादी अंधश्रद्धा रूढ आहेत. तसेच या जमातीमधील लोकांची वेशभूषा प्रामुख्याने पुरुष लंगोटी व धोती परिधान करतात आणि दाढी व मिशा वाढविलेल्या असतात. त्याची शरीरयष्टी मजबूत व बांधेसूद असते आणि जमातीमधील स्त्रिया घागरा किंवा लुगडे परिधान करतात.[१९] तसेच गळ्यामध्ये रंगीबेरंगी मोठ्या मण्याच्या माळा घालतात. इतर समाजाच्या तुलनेत पारधी समाजातील स्त्री-पुरुषांमध्ये भांडणतंटा मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. या समाजातील लोकांना गुन्हेगार म्हणूनच ओळखले जाते. विशेषतः ब्रिटिश राजवटीमध्ये उपजीविकेचे साधन नष्ट झाल्यानंतर राजे, सावकार यांनी त्यांचा उपयोग दरोडे, चोऱ्या यासाठी करून घेतला. त्याचे कारण निरक्षरता हे आहे. विशेषतः या जमातीमधील लोक उदरनिर्वाहासाठी पाथरवटाचे काम करते. वनौषधी विकणे इत्यादी काम करताना आढळून येतात. तसेच जासूदाचे काम करणे, भिक्षा मागणे हेही कार्य ही जमात करते. या समाजातील लोकांची बोलीभाषा सांकेतिक आहे, त्या भाषेला 'बाघरी' असे म्हणतात.[२१]

अलीकडच्या काळात महाराष्ट्र शासनाने या जमातीचा समावेश भटक्या विमुक्त जाती-जमातीमध्ये केलेला आहे. त्यामुळे शासनाने राबविलेल्या अनेक योजनामुळे या समाजातील भटकंती थांबून ते स्थिर जीवन जगत असल्याचे पाहायला मिळते. साधारणतः काही पारधी शेतीव्यवसाय, नोकरी मोठमोठे उद्योग-व्यवसाय करू लागले आहे त्यामुळे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावला आहे.

वडार

या समाजाचे मूळ वस्तिस्थान कर्नाटकामध्ये पाहावयास मिळते. मूळचा द्रविड वंशातील ही जमात असावी असे संशोधकांचे मत आहे. या जमातीमधील लोक प्रामुख्याने तेलगु मिश्रित वडारी भाषा बोलतात. तसेच या जमातीमधील चालीरीती, विवाह समान देवक असलेल्या जातीमध्ये केला जात नाही. या समाजाचा संबंध कैकाडी व चित्पावन ब्राह्मणाशी असल्याचे सांगितले जाते.[२२]

वडार समाजातील लोकांच्या प्रामुख्याने तीन पोटजाती-कासुभोवी, मनोभोवी आणि अप्परभोवी आहेत. विशेषतः उदरनिर्वाहासाठी खाणकाम, मूर्तिकाम, बांधकाम, मजुरी इत्यादी व्यवसाय करताना दिसून येतात. वराहपालन व्यवसाय करतात.[२३] अलीकडच्या काळामध्ये महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना व आधुनिक शैक्षणिक धोरणामुळे या समाजात प्रगती झालेली आढळून येते. शेतीव्यवसाय, नोकरी, उद्योगधंदे इत्यादी क्षेत्रामध्ये त्यांनी नावलौकिक मिळवला

आहे त्यामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक उन्नती झाल्याचे दिसून येते.

**रामोशी**

ही जमात पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. रामोशी हा शब्द रामवंशी या शब्दापासून तयार झाल्याचे सांगितले जाते. या जमातीमध्ये प्रामुख्याने पाच भेद दिसून येतात- बदाले, बेरड, होलगे, कडूमाग इत्यादी. यांची साधारणतः जाधव, चव्हाण, मदने, गायकवाड अशी आडनावे आढळतात.[२४] या जमातीचा पारंपरिक व्यवसाय चोरी करणे व रखवालदारी प्रामुख्याने दिसून येत. त्यामुळे या जमातीला गुन्हेगार म्हणूनच ओळखत.[२५]

या जमातीचे कुलदैवत खंडोबा मानतात तर काळूबाई, जनाई, फिरजाई, तुकोबा, भैरोबा इत्यादी देवदेवतांची पूजाअर्चा करतात. यांच्या जातपंचायतीच्या प्रमुखास नायक असे म्हटले जात असे. या समाजातील मुलींचे लग्न खंडोबाशी लावण्याची प्रथा सुरू आहे. या जमातीमधील वाघ्या-मुरळीचा व्यवसाय करीत असल्याचे संदर्भ मिळतात.[२६] तसेच मृतकाचे श्राद्धविधी हिंदूप्रमाणे करण्यात येतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये या जमातीमध्ये आधुनिक शिक्षण व महाराष्ट्र शासनाच्या योजनांमुळे बदल घडून आले आहेत. विशेषतः ते शेतीव्यवसाय, कोतवाली व्यवसाय करू लागले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राबरोबरच माढा तालुक्यातील रामोशी जमातीचा आर्थिक सामाजिक विकास घडून येत आहे.

याशिवाय भटक्या विमुक्त जाती-जमातीमध्ये लमाण, गोंड, देऊळवाले, भिल्ल इत्यादींचा संचार तालुक्यामध्ये झालेला दिसून येतो. अपवादात्मक काही जमातीचे लोक तुरळक वस्ती करून राहिल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

माढा तालुक्यातील भटक्या-विमुक्त जाती-जमाती सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुधारणा घडून आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या योजना उदा. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास योजना, इंदिरा गांधी घरकुल योजना, कुळकायदा इत्यादीमुळे उदरनिर्वाहाच्या साधनामध्ये बदल झाले, आहेत. रामोशी, नंदीवाले, पारधी, वडार, डोंबारी, गोंधळी अलीकडच्या काळात शेतीव्यवसायास पूरक व्यवसाय करू लागले आहेत. त्यामुळे साहजिकच सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडून आल्या आहेत. त्यामुळे त्यांचे राहणीमान व जीवनशैली बदलत आहे.

⊙⊙⊙

संदर्भ


१. कदम धोंडिबा, महाराष्ट्रातील भटकी समाज संस्कृती व साहित्य, प्रतिभा प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. ५३५
२. Gazetter of Solapur District, 1997, page 238.
३. कित्ता
४. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश खंड-२, १९६४, पृ. ५३६.
५. कित्ता
६. कित्ता
७. लोंढे अंकुश (संपा.) साप्ताहिक बारलोणी टाइम्स, दि. १४/११/२०१७
८. कित्ता
९. Gazetter of Solapur District, 1997, page 240
१०. कित्ता
११. मुलाखत - रुकमाबाई महादेव चव्हाण, दि. ०२/०१/२०१८
१२. कित्ता
१३. मंडले शैलजा, विमुक्त व भटक्यांची सद्यःस्थिती आणि उपाययोजना, अक्षय प्रकाशन, रत्नागिरी, इ. स. २०१२, पृ. ६४.
१४. कित्ता
१५. कित्ता
१६. कित्ता
१७. कित्ता
१८. Kennedy M. Notes on the Criminal Class in the Bombay, 1908.
१९. कित्ता
२०. कित्ता
२१. कालेलकर गो. म., मुंबई इलाख्यातील जाती, पुणे, १९२८, पृ. १७३.
२२. कित्ता
२३. अत्रे वि. ना., गुन्हेगार जाती, पुणे, १९११, पृ. २१४.
२४. कित्ता
२५. कित्ता
२६. कित्ता